# पुण्य-पाप यांचे प्रकार आणि परिणाम

## मनोगत

जीवन कर्ममय आहे. कर्मफळ अटळ आहे. चांगल्या कर्माचे फळ पुण्य देते आणि त्याने सुखप्राप्ती होते, तर वाईट कर्माचे फळ पाप देते अन् त्याने दुःख होते. बऱ्याचदा 'सदाचरणी असूनही सज्जन जीवनात दुःख भोगत आहेत, तर गुंड, भ्रष्टाचारी इत्यादी दुर्जन अनेक दुष्कृत्ये करत असूनही ऐश्वर्यादी सुखे उपभोगत आहेत', असे चित्र आपल्याला दिसते. मग 'दुर्जनांना त्यांच्या पापांचे फळ कसे मिळत नाही', असा प्रश्न कोणाच्याही मनात येऊ शकेल. पूर्वजन्मांतील पुण्याईमुळे दुर्जनांना सुख प्राप्त होते; मात्र पुण्याचा साठा संपल्यावर त्यांना त्यांच्या पापकर्मांची फळे, म्हणजे रोग, दारिद्र्यादी दुःखे आणि मृत्यूनंतर नरकभोगादी दुःखे अवश्यमेव भोगावी लागतात; त्यांपासून कोणाचीच सुटका होत नाही. यास्तव पापांचे परिमार्जन होणे अत्यावश्यकच आहे. दैनंदिन व्यवहारात मनुष्याकडून नकळतपणेही पापकर्मे सतत घडत असतात, उदा. केरसुणीने घर झाडतांना कोळी-कीटकांची हत्या होणे, दुसऱ्याशी कठोरपणे बोलणे, इतरांचा द्वेष करणे इत्यादी. थोडक्यात, मनुष्याला पाप टाळणे हे केवळ अशक्य आहे. आपण केलेल्या पापांविषयी पश्चात्ताप होऊन पापांचे परिमार्जन करण्यासाठी धर्माने सांगितलेल्या शिक्षा भोगणे, याला 'प्रायश्चित्त' म्हणतात. प्रस्तूत ग्रंथात पाप लागण्याची आणि न लागण्याची विविध कारणे, प्रायश्चित्त कर्मे यांसह पुण्य वाढवण्याचे महत्त्व आणि पुण्य निर्माण करणारी कर्मे यांविषयीही सुबोध मार्गदर्शन केले आहे.

पाप-पुण्यात्मक कर्मांमुळे निर्माण होणाऱ्या सुख-दुःखाच्या बंधनापलीकडे जाऊन सतत सच्चिदानंद अवस्थेत रहाता येण्यासाठी असे कर्म करावे लागते की, ज्यामुळे कर्मफल लाभत नाही. कर्माचे परिणाम टाळण्यासाठी काय करावे, याचाही ऊहापोह या ग्रंथात केला आहे.

हा ग्रंथ वाचून वाचकांना पाप-पुण्याकडे पहाण्याची एक नवी दृष्टी लाभावी आणि पाप-पुण्याच्या पलीकडे जाऊन आनंदप्राप्ती करून घेण्यासाठी सदैव साधना करण्याची प्रेरणा मिळावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**

---

(सनातनच्या 'कर्मयोग' या मालिकेचे सामाईक मनोगत 'कर्माचे महत्त्व, वैशिष्ट्ये आणि प्रकार' या ग्रंथात दिले आहे.)

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


१. **कर्मांचे परिणाम :** सुख अन् दुःख; संस्कार; पाप-पुण्य आणि अहंभाव किंवा न्यूनगंड **१०**

२. **पुण्य** **११**

* व्याख्या ११
* पुण्य मिळण्याची कारणे १२
* पूर्वपुण्याईने प्राप्त होणाऱ्या गोष्टी १४
* अपराध्याचे पुण्य बलवत्तर असेपर्यंत तो न सापडणे १५
* पुण्य न मिळणे १५
* पुण्याचे प्रकार - शुद्ध पुण्य आणि अशुद्ध पुण्य १५
* व्यष्टी पुण्य आणि समष्टी पुण्य यांचा परिणाम १७
* पुण्य जाळून टाकणाऱ्या गोष्टी १८
* पुण्य संपल्याची लक्षणे १८
* साधना करून पुण्य वाढवण्याचे महत्त्व १९
* पुण्यकर्म गुप्त ठेवावे २२

३. **पाप** **२२**

* व्याख्या २२
* व्यवहारात पाप टाळणे अशक्य असणे २३
* पापाची विविध कारणे (स्वार्थ, परनिंदा आदी) २४
* पापाचे प्रकार आणि परिणाम (कर्मविपाक) ३१
* पापाच्या तीव्रतेनुसार मृत्यूनंतरचे भोग आणि मिळणारा जन्म ४६
* पापाचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ६२